# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.04.2024** **वारःगुरुवार**

---

1. उन्हाळ्यात उष्णतेशी निगडीत आजारांवर सज्जतेचा केंद्राद्वारे आढावा
2. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याचा आज अखेरचा दिवस
3. संजय निरूपम यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी
4. नाशिक जिल्ह्यात पाणी टंचाईचं संकट गंभीर आणि
5. सहा आणि सात तारखेला राज्यात काही ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा

**उष्णतेची-लाट**

उन्हाळ्याच्या हंगामात उष्णतेशी निगडीत आजारांची काळजी घेण्यासाठी आरोग्य यंत्रणा कितपत सज्ज आहे याचा आढावा काल केंद्र सरकारनं घेतला. आरोग्य मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी नमूद केलं उष्णतेमुळं होणाऱ्या आजारांबाबत अचूक माहिती उपलब्ध नसल्यामुळं राज्यांनी ही माहिती केंद्राकडं पाठवावी, म्हणजे एकत्रित माहितीचा कोष तयार करता येईल. या माहितीमध्ये उष्माघातामुळं होणारे मृत्यु आणि रुग्णांची माहिती मिळाल्यास वास्तविक मूल्यांकन करता येईल. हवामान विभागानं इशारा देताच राज्यांनी तत्काळ कृती करावी असं या बैठकीत ठळकपणे सांगण्यात आलं. आरोग्य राज्य मंत्री डॉक्टर भारती पवार या बैठकीत बोलताना म्हणाल्या की लोकांमध्ये उष्णतेसंबंधी आजारांबाबत जागरुकता पसरवण्यासाठी राज्य आणि जिल्हा स्तरीय समित्या स्थापन कराव्यात. आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये थंड पाण्याची यंत्रं, बर्फाचे पॅक्स आणि अन्य आवश्यक सामग्री सुसज्ज ठेवणं महत्वाचं आहे असंही त्यांनी नमूद केलं.

**लोकसभा-दुसरा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस आहे. बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातील 88 जागांसाठी या टप्प्यात 26 एप्रिलला मतदान होणार असून त्यात महाराष्ट्रातील 13 जागांचा समावेश आहे. निवडणूक आयोगानं काल राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक यांना निवडणुकीदरम्यान बेकायदेशीर दारु, रोख रक्कम, अमली पदार्थ, शस्त्रं आणि मोफत भेटवस्तूंचं वाटप रोखण्यासाठी करडी नजर ठेवण्यास सांगितलं. राज्यांच्या सीमांवर पाळत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**ठाकरे गटउमेदवार**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आपल्या चार उमेदवारांची काल घोषणा केली. कल्याण लोकसभा मतदारसंघातून वैशाली दरेकर, पालघर लोकसभा मतदारसंघात भारती कामडी, जळगाव लोकसभा मतदातसंघासाठी करण पवार आणि हातकंणगले मतदारसंघात सत्यजित पाटील यांना उमेदवारी देण्यात आल्याचं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईत जाहीर केलं. हातकणंगले जागेसाठी चौरंगी लढत होणार आहे. दरम्यान, जळगावचे भारतीय जनता पक्षाचे खासदार उन्मेष पाटील यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

**निरुपम**

काँग्रेस नेते आणि माजी खासदार संजय निरूपम यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षविरोधी वक्तव्यं आणि शिस्तभंगांच्या तक्रारीनंतर पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी निरूपम यांना काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेतल्याचं काँग्रेसचे सरचिटणीस के.सी.वेणुगोपाल यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**अर्ज-शपथ-नांदेड**

लोकसभा निवडणुकीसाठी नांदेड मतदारसंघात आतापर्यंत 19 उमेदवारांचे 20 अर्ज दाखल झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली आहे. काँग्रेस उमेदवार वसंतराव चव्हाण यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. चव्हाण यांनी दोन अर्ज दाखल केल्यामुळे नांदेड लोकसभा मतदार संघात 19 उमेदवारांचे 20 अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, नांदेड जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये उमेद स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी मतदाना विषयी जनजागृती करुन मतदानाची शपथ घेण्याच आवाहन केलं होतं, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातल्या विविध गावात दोन लाखपेक्षा अधिक महिलांनी प्रत्येक गावात शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली.

**अर्ज-अकोला**

भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अनुप धोत्रे यांनी काल अकोला लोकसभा मतदार संघासाठी आपला उमेदवारी अर्ज भरला यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आदी उपस्थित होते. यावेळी त्यांनी भारतीय जनता पक्ष कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत फेरी काढत जोरदार शक्ती प्रदर्शन केल.

**ओळखपत्र-धुळे**

मतदार ओळखपत्र टपाल कार्यालयामार्फतच मोफत घरपोच वितरीत करण्यात येत असल्यामुळे मतदारांनी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, असं आवाहन धुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केल आहे. धुळे शहरात बनावट मतदार ओखळपत्र तयार करण्यात येत असल्याचा प्रकार पोलिसांनी केलेल्या कारवाईत उघड झाला होता. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी गोयल यांनी नागरीकांना सतर्क करण्यासाठी हे आवाहन केल आहे.

**सुविधा-रायगड**

दिव्यांग मतदारांना मतदान सोयीचं व्हावं म्हणून त्यांना सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. रायगड लोकसभा मतदार संघात दिव्यांगांसाठी 1 हजारहून अधिक चाकाच्या खुर्च्या उपलब्ध ठेवल्या आहेत.

**पाणीटंचाई-नाशिक**

नाशिक जिल्ह्यात पाणी टंचाईनं भीषण स्वरूप धारण केलं आहे. जिल्ह्यातल्या अनेक नगरपालिका क्षेत्रात दररोज पाणी पुरवठाही होत नाही. सध्या मनमाड शहराला महिन्यातून एकदा, नांदगाव शहरामध्ये 22 ते 23 दिवसाआड, चांदवडला पाच ते सहा दिवसाआड, येवला पाच दिवसांनी, मालेगावला दोन दिवसांनी, सटाणा सिन्नर आणि वणी इथं एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. सध्या सात तालुक्यातील 203 गाव आणि 436 वाड्यांना 210 टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. तसेच टँकर आणि गावांसाठी जिल्ह्यातील 67 खासगी विहिरी अधिग्रहीत करण्यात आल्या. गेल्या वर्षी कमी पाऊस झाल्यामुळे यंदा टंचाईची झळ वाढणं अपेक्षित होतं, मात्र एप्रिल महिन्यातच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात टंचाई जाणवत आहे.

**पाणी-पुणे**

पुणे शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता मुळशी धरणातुन 5 टीएमसी पाणी घ्यावं लागणार आहे. शहरात पाणी कपात केली जाणार नाही, मात्र नागरिकांनी पाणी साठ्याचा विचार करुन पाणी जपूनच वापरण्याचं आवाहन पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी केलं आहे. पुणे महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या 34 गावांमध्ये जलवाहिन्यांचं मोठं जाळं नसल्यामुळं पाणीपुरवठा करण्यास अडचण येत आहे. पुणे शहरात पिण्याचं पाणी बांधकामांसाठी वापरलं तर बांधकामं बंद करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशाराही डॉक्टर भोसले यांनी दिला आहे.

**मालमत्ता कर-नवी मुंबई**

नवी मुंबईत गेल्या आर्थिक वर्षात मालमत्ता करापोटी 716 कोटी 97 लाख रुपयांचं उत्पन्न जमा झालं आहे. आतापर्यंतचं हे सर्वात विक्रमी उत्पन्न आहे तत्पूर्वीच्या आर्थिक वर्षात 633 कोटी 31 लाख रुपये मालमत्ता कर जमा झाला होता. त्यामध्ये यावर्षी 83 कोटी 66 लाख रुपयांची वाढ झाली आहे. नागरिकांनी मालमत्ता कर भरणा करावा यासाठी

पालिकेनं वेगवेगळ्या टप्प्यांत अभय योजना राबविली होती. तसंच थकबाकीदारांवर लक्ष केंद्रीत करून वसुलीसाठी पाठपुरावा करण्यात आला होता.

**शेतकरी अपघात विमा**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपधात विमा योजनेतर्गंत दोन खंडीत कालावधीतील प्राप्त झालेले विमा दावे निकाली काढण्यासाठी राज्य सरकारनं 20 कोटी 78 लाख रूपये मंजूर केले आहेत. त्यानुसार प्राप्त विम्याची रक्कम संबंधित विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाकडं हस्तांतरित करण्यात आली आहे अशी माहिती पुण्याचे कृषी संचालक दिलीप झेंडे यांनी दिली. राज्यातील सात हजार कुटुंबांना अपघात विमा आणि सानुग्रह योजनेत सर्वाधिक 140 कोटी रूपये दिले असल्याचंही झेंडे यांनी सांगितलं.

**पेटंट**

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉक्टर नारायण मुसमाडे यांनी पिकांना जमीनीमधून रोग पसरविणाऱ्या बुरशींच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करुन संकरीत सिल्व्हर नॅनोपार्टीकल्सचं संशोधन करुन प्रबंध सादर केला. त्याबद्दल गुजरातमधील नवसारी विद्यापीठाची आचार्य पदवी त्यांना मिळाली आहे. केळीच्या खोडाचा रस आणि खेकड्याच्या आवरणात उपलब्ध असलेल्या घटकाचा संयुक्त वापर करुन केलेल्या या संशोधनामुळं पर्यावरणाला अनुकूल पध्दतीनं रोग नियंत्रण करता येईल. बुरशीनाशक अंशविरहित उत्पादन घेण्यासाठी या संशोधनाचं मोठं योगदान असेल. त्यांच्या या संशोधनासाठी केंद्र सरकारनं त्यांना पेटंट बहाल केलं आहे.

**सैनिक शाळा**

राजकीय किंवा विचारसरणीवर आधारित संस्थांना नवीन सैनिकी शाळांसाठी परवानगी दिली जात असल्याच्या वृत्ताचं संरक्षण मंत्रालयानं खंडन केलं आहे. अशा प्रकारच्या बातम्या निराधार असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. सैनिक स्कूल सोसायटीच्या अंतर्गत 1960 मध्ये सैनिक शाळांची स्थापना करण्यात आली. सध्याच्या 33 अशा शाळांचं यश पाहून देशभरातून सैनिक शाळांसाठी परवानगी मागण्यात येत आहे. त्यामुळं सैनिक शाळांच्या धर्तीवर शिक्षण पुरविण्यासाठी पहिल्या टप्प्यात देशभरात 100 शाळा स्थापन करण्याची योजना सरकारनं सुरु केली आहे. त्यासाठीची निवड प्रक्रिया अतिशय कठोर असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**लाच-हिंगोली**

हिंगोली जिल्ह्यात कृषी सौर पत्रे बसविण्याचं सर्वेक्षण करून देण्यासाठी चार हजार रुपये लाच स्वीकारताना महावितरण कंपनीच्या वरिष्ठ तंत्रज्ञाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं पकडलं.

**हवामान**

मराठवाड्यात ढगाळ आणि अन्यत्र कोरडं हवामान राहील. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात उद्यापासून तीन दिवस हलका ते मध्यम पाऊस पडेल. सहा आणि सात तारखेला जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल.

# नमस्कार.